
# डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

## वार्षिक अहवाल 2015-16




# भावपूर्ण श्रध्दांजली



मा. विद्यासागर राव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांना संस्थेची माहिती देतांना मा.कृष्णदास भाई पाटील, अध्यक्ष, डॉ. हेडगेवार सेवासमिती,नंदुरबार



खांडबारा परिसरातील नेसु नदी पूजन या कार्यक्रमास उपस्थित मा. कृष्णदास भाई पाटील, जलतज्ञ मा. मुकुदराव धाराशिवकर, मा.डॉ. गजानन डांगे, अध्यक्ष, योजक, मा. ललीत पाठक



संस्थेच्या आनंदोत्सव कार्यक्रमात मा. कैलासजी जैन यांचे स्वागत करतांना संस्थेचे अध्यक्ष मा.कृष्णदासभाई पाटील मध्यभागी संस्थेचे जेष्ठ सदस्य श्री. नाना कासार



रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त रक्तदान करतांना विकास सहयोगी

BPT REG.- F / 2268 / DHULE
SRA. REG.- MAHARASHTRA / 2439 / DHULE
80-G Certificate No. (NSK/CIT-1/80-G(5)
valid from dated- 01-04-2009)

## विश्वस्त मंडळ (2014-2019)

| | |
|---|---|
| श्री. कृष्णदास काशिनाथ पाटील | अध्यक्ष |
| श्री. रविंद्र गजानन बेलपाठक | उपाध्यक्ष |
| श्री. ललितकुमार बाळकृष्ण पाठक | सचिव |
| श्री. वासुदेव बळवंत राव | खजिनदार |
| श्री. रंगनाथ रुंझाजी नवले | सदस्य |
| श्री. नानाभाऊ ओंकार माळी | सदस्य |
| श्री. केदारनाथ रत्नाकर कवडीवाले | सदस्य |
| श्री. जत्र्या लिंबा पावरा | सदस्य |
| श्री. अजय ओमप्रकाश शर्मा | सदस्य |
| डॉ. नितीन विष्णू पंचभाई | सदस्य |
| श्रीमती. मिनल संजय म्हसावदकर | सदस्या |

जलसंवर्धनाचा मंत्र न्यारा, शेततळे हा उपाय खरा

# वार्षिक अहवाल 2015-16

नमस्कार,

ह्या २०१५-१६ चा वार्षिक अहवाल आपल्या समोर आहे. संस्थेच्या कार्यवाढीचा हा आढावा आपणासमोर सादर करतांना आनंद होत आहे. संस्था मोठी होतांना काही टप्पे असतात चिंतनाचे, सिंहावलोकनाचे अशा टप्प्यावर म्हणजे रौप्य महोत्सवी वर्षाच्या टप्प्यावर संस्था येऊन पोहोचली आहे.

संस्थेने वेगवेगळ्या क्षेत्रात केलेली प्रगती अभिमानास्पद आहे. पण अजून बरेच काही करायचे आहे.

संथेचे काम, संस्थेची प्रगती याचा विचार करतांना 'जगन्नाथाचा रथ' हा शब्द तर भगवान कृष्णाने करंगळीवर उचललेला गोवर्धन हे दृश्य मला नेहमी आठवत. कारण हे एकट्या-दुकट्याचे यश नाही तर हे सामुहिक यश आहे. सामुदायिक प्रयत्नातच दृश्यचित्र आहे.

संस्था आपल्या सगळ्यांच्या सहकार्यांच्या मार्गदर्शनाने व सहकार्याने काम करते त्यामुळे आपल्या सगळ्यांच्या सामुहिक प्रयत्नांचा हा लेखा-जोखा आहे.

आपले सगळ्यांचे सहकार्य आणि संस्थेच्या प्रगतीशील सहभाग आणखी वाढवा अशी मी अपेक्षा करतो. संस्थेचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने अनेक मान्यवरांच्या संस्थेला भेटी व कार्यक्रम हे घडून येत आहे याचा अभिमानही आहे.

आपण आणखी आपल्या कामाची गती वाढवावी असे वाटते. पुन्हा एकदा ह्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या आपल्याला शुभेच्छा देतो,..... हरी ओम !!

अध्यक्ष,

डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

# Vision

विकास प्रकिया गतिमान आणि स्वयंपुर्ण करण्याकरिता विविध क्षेत्रात प्रशिक्षीत मनुष्यबळ उभे करण्याची निरंतर व्यवस्था तयार करणे, परंपरागत व आधुनिक तंत्राचा कालसुसंगत मेळ घालुन सहभागीतेतुन शाश्वत विकास करणे.

अ) संस्थात्मक माहिती -

| | |
|---|---|
| A) संस्थेचे नाव | - डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार |
| i) रजिस्ट्रेशन क्रमांक | - महा./ 2439 / धुळे दि. 18/09/1991. |
| | - एफ / 2268 / धुळे दि. 22/05/1992. |
| ii) पत्रव्यवहारासाठी पत्ता | - 20, इंदिरा सदन, लोकमान्य कॉलनी, नंदुरबार फोन क्र.-02564-223910<br>Website - www.hssnandurbar.org<br>E-mail- hssnandurbar@gmail.com |


B) लेखापरिक्षकांचे नाव व पत्ता -

श्री. प्रकाश जी. पाठक
प्रकाश जी पाठक ऍन्ड असोसीएट्स, चार्टड अकौंटटस
16, अथर्व, विनायक नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.

C) कर्मचारी माहिती-

- डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार - 04
- कृषि विज्ञान केंद्र, कोळदा - 15
- National Initiative Climate Resilient Agriculture - 02
- प्राथमिक आश्रम शाळा जळखे - 17
- माध्यमिक आश्रम शाळा जळखे - 11
- ट्रायबल डेव्हलपमेंट प्रोजेक्ट - 03

D) प्रकल्प वृक्ष -




E) अन्य हितसंबंधीं संस्था-

I) BAIF.

II) AGRICULTURAL UNIVERCITIES.

III) NABARD.

IV) VARIOUS NGO`s.

## ब) कार्याची माहिती –

1) प्रकल्प, उद्देश व त्यांची कार्ये

(i) **प्रकल्प्-** प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, जळखे

**उद्देशे-** शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देणे. शिक्षणासह सुसंस्कारीत व ध्येयप्रणव पिढी उभी करणे.

**कार्य -** नंदुरबार जिल्हयातील 5 तालुक्यातुन 52 गावातुन 476 विद्यार्थी व विद्यार्थीनींचे इ. 1 ली ते इ. 10 वी पर्यंतचे निवासी शिक्षण उपलब्ध.

(ii) **प्रकल्प -** ग्रामीण उत्थान प्रकल्प (VDP)

**उद्देश -** ग्रामीण विकासासाठी कार्य करणे व विकासाचे सुसंगत मॉडेल उभे करणे.

**कार्य -** या प्रकल्पाअंतर्गत विविध यंत्रणांनी आपापले प्रयोग, प्रात्यक्षीके, प्रशिक्षणे राबवून एकत्रित व समन्वयीत पध्दतीने ग्राम विकास करणे. हा प्रकल्प धडगाव तालुक्यात राबविला जातो.

(iii) **प्रकल्प -** जनजाती विकास प्रकल्प (TDP)

**उद्देश -** ग्रामीण विकासासाठी कार्य करणे व विकासाचे काल सुसंगत मॉडेल उभे करणे.

**कार्य -** प्रकल्पाअंतर्गत 500 कुटूंबांसाठी शेतीतुन दरवर्षी उत्पन्नाची सोय करुन देणे जेणे करुन शेतकऱ्यांचे व पर्यायाने त्यांच्या पिढींचे स्थलांतर थांबविणे.

(iv) **प्रकल्प-** कृषि विज्ञान केंद्र (KVK)

**उद्देश-** कृषी संबंधीचे आधुनिक तंत्रज्ञान लोकांपर्यंत पोहचविणे.

**कार्य-** संपुर्ण जिल्हयात वर्षभर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातुन व प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या भेटी घेवुन शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचविण्याचे कार्य हया केंद्रामार्फत चालते. दरवर्षी 7 दिवसीय कृषी तंत्रज्ञान महोत्सवाचे आयोजन केले जाते.

(v) **प्रकल्प-** शिक्षण संसाधन केंद्र (ERC)

**उद्देश-** औपचारिक शिक्षणासोबत अनौपचारिक शिक्षणाची माहिती देणे.

**कार्य-** नंदुरबार जिल्हयातील काही पुर्व प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास करणे.

2) संस्थेच्या कार्याची भौगोलिक व्याप्ती -

नंदुरबार व धुळे जिल्हा (सध्या नंदुरबार जिल्हयात कार्य सुरु आहे)

3) भविष्यातील उपक्रम -

- आरोग्य सेवा
- इंग्लिश मिडीयम स्कुल

## विशेष कार्यक्रम

**1) आनंद सोहळा रौप्य महोत्सव –** वर्ष 2015-16 या वर्षात संस्था रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असल्याने आनंद सोहळयाचे आयोजन संस्थेमार्फत करण्यांत आले. शहरातील 170 मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष मा. कृष्णदासभाई पाटील, प्रमुख अतिथी दोंडाईचा येथील मा. कैलासलजी जैन, हस्ती बँकेचे चेअरमन यांची उपस्थिती लाभली. संस्था उभारणीत ज्यांनी संसथेला मोलाचा सहयोग देवुन आपला पाठींबा दर्शविला अशा सर्वांचा सत्कारमुर्तींचा संस्थेतर्फे `सन्मान चिन्ह` देवुन या निमित्ताने गौरव करण्यांत आला. या निमित्ताने संस्थेतील 25 वर्षातील संस्था काम कसे मोठे झाले या बाबतची 'साधना' ही एक चित्रफीत तयार करण्यात आली. या `साधना` चित्रफितीचे उद्घाटन मा. कैलासजी जैन यांच्या हस्ते करण्यात आले.

**2) संस्था पाहणी कार्यक्रम-** डॉ. हेडगेवार सेवा समिती अंतर्गत खांडबारा परिसराला दि. १०/१०/२०१५ रोजी मा. गिरीशजी महाजन यांनी भेट दिली. या भेटी दरम्यान खांडबारा परिसरात सुरु असलेल्या फळबाग लागवड, भाजीपाला लागवड, तांदूळ महोत्सव, नेसू नदीवरील प्रयोग, सूक्ष्म सिंचनाची माहिती शेतकर्यांनी दिली.

मा. गिरीशजी महाजन यांनी संपूर्ण प्रयोगाविषयी माहित घेतली. नेसू नदी वरील पाणी व्यवस्थापन नियोजन पहिले व नदी वरील गतानाशी संवाद साधला. दरम्यान मा. प्रदीप पी., जिल्हाधिकारी विविध प्रयोगाला भेट देऊन शेतकर्यासमावेत पिक पद्धती, पाणी वापर या विषयी चर्चा केली.

**3) माता-पिता पुजन/ पालक मेळावा व क्रीडा गौरव पुरस्कार सोहळा-** दि.14 फेब्रुवारी 2016 रोजी आश्रमशाळेत माता-पिता पुजन/पालक मेळावा व क्रीडा गौरव पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी संस्थेचे अध्यक्ष मा.कृष्णदासभाई पाटील यांनी भूषविले.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून

मा.आमदार डॉ.विजयकुमारजी गावीत हे होते. कार्यक्रमास संस्था सचिव श्री ललीतदादा पाठक, ज्येष्ठ विश्वस्त श्री आप्पासाहेब नवले, क्रीडा भारती चे अ.भा.मंत्री मा.राजजी चौधरी, अ.भा.कोषाध्यक्ष मा केशवरावजी नांदेडकर, जिल्हा क्रीडा अधिकारी मा.श्री घन:श्यामजी राठोड, संस्थेचे सन्माननीय सभासद व क्रीडा भारतीचे सन्माननीय पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात दिपप्रज्वलनाने झाली. सर्व मान्यवर अतिथींचे शाळेतील विद्यार्थीनींनी शब्दसुमनांनी स्वागत केले. यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी यावेळी आपल्या आई वडीलांचे पुजन केले. ज्या विद्यार्थ्यांचे पालक काही कारणने येवू शकले नाही त्यांनी आलेल्या पाहुण्यांचे पुजन केले. सदर प्रसंगी संस्थेचे सभासद श्री बळवंतजी निकुंभ यांना राज्य शासनाचा 'शिव छत्रपती पुरस्कार' मिळाल्याबददल संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच क्रीडा भारतीच्या जिल्हयातील राज्य् व राष्ट्रीय पातळीवर विशेष पुरस्कारप्राप्त खेळाडुंचा 'राजमाता जिजाऊ पुरस्कार' देऊन विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

**4) महिला विकास कार्यक्रम अंतर्गत -** TDP प्रकल्प अंतर्गत खांडबारा समुहातील 8 गावातील महिला बचतगटांना प्रत्येक गावातील दोन गटांना उद्योगासाठी म्हणुन प्रकल्प अंतर्गत प्राथमिक प्रक्रिया उद्योग व शेतकरी सुविधा केंद्र उभेकरण्यात आले. त्यात प्रकल्प अंतर्गत आर्थिक सहाय्य 25% व गटाचा 75% लोकसहभाग मिळुन युनिट महिला बचत गटाकडे युनिट उभे केले.

त्या प्राथमिक प्रक्रिया उद्योग केंद्रात -मोबाईल राईसमिल, पॅडी थ्रेसर, कडबा कुट्टी यंत्र, आनंद सेवरेट, इ. तसेच शेतकरी सुविधा केंद्रामध्ये, श्रमकमी करणारे अवजारे, स्प्रे पंप, मोगी कोळपे, विळे, इत्यादी पुरविण्यात आले आहे. शेतमाल प्राथमिक प्रक्रिया केंद्र सहा बचतगटाकडे सुरु करण्यात आले. या प्रयोगामधून प्रत्येक बचत गटाला दरमहा ६०००/- ते १०,०००/- रुपये मिळत आहेत. या प्रयोगामुळे गावमध्ये भात प्रक्रिया उद्योग सुरु झाल्यामुळे शेतकरी भाता ऐवजी तांदूळ विक्री करतात. तांदूळ विक्री केल्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

या सहा गावांमध्ये तुसाच्या मोबदल्यात तांदूळ काढून दिला जातो. तांदूळ काढण्यासाठी वेगळी किंमत मोजावी लागत नाही.

# 1. डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार

अहवाल वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविले गेले.

1) **जागतीक रक्तदाता दिवस -** (11/06/2015) जागतीक रक्तदाता दिवस निमित्ताने संस्थेतर्फे रक्तदान शिवीराचे आयोजन जन कल्याण रक्तपेढी नंदुरबार येथे करण्यांत आले. एकुण 11 जणांनी या कार्यक्रमांत सहभाग नोंदवुन रक्तदान केले.

2) **श्री सत्यनारायण पुजा** (18/09/2015)**-** आज दि.18 सप्टेंबर रोजी संस्थेने रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले त्यानिमित्ताने सत्यनारायणाची पुजेचा कार्यक्रम संस्थेचा कार्यालयांत घेण्यांत आला.

3) **दुष्काळग्रस्तांसाठी मदत-** संस्थेने 18/09/2015 रोजी रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण केले त्या निमित्ताने सत्यनारायण पुजेचे आयोजन केले होते. पुजेसाठी आलेल्या भाविकांना आवाहन संस्थेने दुष्काळग्रस्तांसाठी मदत करण्याचे आवाहन केले त्यातुन उभी झालेली रक्कम रुपये 5000/- दुष्काळग्रस्तांसाठी मदत म्हणुन नंदुरबार जिल्हयांचे कलेक्टर यांना सुपूर्त करण्यांत आली.

4) **मुंबई हल्ला स्मृति दिवस** (26/11/2015)- 26 नोव्हेंबर 2008 रोजी मुंबई वर झालेल्या अतिरेकी कारवाईस 7 वर्ष पुर्ण झाल्याच्या निमित्ताने संस्थेने नंदुरबार शहरातील पोलीस मुख्यालयांत जावुन सत्कार केला. पोलीसांचा कार्यवाही मुळेच अनेक लोकांचे प्राण वाचविण्यांस मदत झाली असे मत संस्थेचे सचिव श्री.ललित पाठक यांनी मांडले. श्री.नानाभाऊ माळी, श्री.वासुदेव राव, श्री.संजय पाटील, श्री.सरदार पावरा व विकास सहयोगी उपस्थित होते.

5) **रक्तदान शिबिर:-** (20/12/2015) - संस्थेने मानव अधिकार फोरम, माहेश्वरी नवयुवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कन्यादान मंगल कार्यालयांत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरात एकुण 51 रक्तदात्यांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे 2 रक्तदाते हे 65 वय वर्गातीले होते तसेच 2 महिलांनी रक्तदान केले. कन्यादान मंगल कार्यालयाचे मालक श्री.संदीप चौधरी तसेच जनकल्याण रक्तपेढीचे यासाठीचे योगदान महत्वाचे हाते. संस्थेचे श्री.ललितकुमार पाठक, श्री.नानाभाऊ माळी, श्री.वासुदेव राव उपस्थित होते.

6) **वार्षिकोत्सव 'मृदगंध'-** संस्थेचा वार्षिकोत्सव 'मृदगंध' कार्यक्रमाचे आयोजन दिनांक 20 मार्च 2016 रोजी कृषि विज्ञान केंद्र, कोळदा ता.जि. नंदुरबार येथे करण्यात आले.

या स्नेहमिलनास मुंबई येथील प्रसिध्द केशवसृष्टीच्या अध्यक्षा डॉ.अलकाताई मांडके उपस्थित होत्या. प्रास्ताविकात संस्थेची उद्दिष्टये, उपलब्धता, विकासातील योगदान या विषयी माहिती सचिवांनी दिली.

विकास सहयोगींव्दारा विविध कलागुण दर्शनाचा कार्यक्रम या निमित्ताने करण्यात आला.

डॉ. अलकाताई मांडके यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना संस्थेच्या कामाचे मनपुर्वक कौतुक केले. भविष्यात सुध्दा संस्थेच्या विविध कामांच्या माध्यमातुन संस्थेशी जुडुन रहाणे आवडेल, असे मनोगत व्यक्त केले. अलकाताई बरोबर प्रा. अमेया जाधव हया देखील उपस्थित होत्या.

## 2. आश्रमशाळा जळखे

आश्रमशाळेत या अहवाल वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविले गेले.

1) **जागतिक योग दिवस-** दि.21 जून 2015 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेला जागतिक योगदिन कार्यक्रम आश्रमशाळेत साजरा करण्यात आला.सकाळी 7.00 ते 7.35 या वेळेत योग प्रणायाम व योगासने केली.या कार्यक्रमाला आश्रमशाळेतील सर्व विकास सहयोगी उपस्थित होते.

2) **गुरूपौर्णिमा-** दि.31 जुलै 2015 रोजी आश्रमशाळेत गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेच्या पदाधिका-यांनी आश्रमशाळेच्या सर्व गुरूजींचा यथोचित सत्कार केला.कार्यक्रमास संस्थेचे सचिव मा.ललीतदादा पाठक,सभासद मा.प्रा.संजयजी पाटील व मा.बळवंतरावजी निकुंभ हे उपस्थित होते.

3) **लोकमान्य टिळक पुण्यतिथी-** दि.01 ऑगस्ट 2015 रोजी आश्रमशाळेत थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी झाली.याप्रसंगी शाळेत वक्तृत्व स्पर्धा घेध्यात आली या स्पर्धेत एकुण 22 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला .

4) **स्वातंत्र्य दिवस-** दि.15 ऑगस्ट 2015 रोजी आश्रमशाळेत स्वांतंत्र्यदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.नंदुरबार येथील तरूण उद्योजक मा.नरेंद्रजी जैन यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.

5) **रक्षाबंधन-** दि.29 ऑगस्ट 2015 रोजी आश्रमशाळेत रक्षाबंधनाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी रेल्वे पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना आश्रमशाळेतील विद्यार्थिनींनी राखी बांधली व शाळेत वृक्षारोपण केले.

6) **क्रिडा स्पर्धा-** दि.23 सप्टेंबर 2015 रोजी आश्रमशाळेत प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्रकल्प नंदुरबार यंदाच्या संयुक्त विद्यमाने केंद्रस्तरीय क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.या क्रिडा स्पर्धांचे उदघाटन नंदुरबार प्रकल्पाचे सहा.प्रकल्प अधिकारी श्री आर.आर. पाटील यांचे हस्ते करण्यात आले.

7) **कुमारीका पुजन-** दि.21 ऑक्टोंबर 2015 रोजी कुमारीका पुजनाचा कार्यक्रम शाळेत संपन्न झाला यावेळी पाठक परीवारातील मा.ललीतदादा पाठक व सौ अर्चनाताई पाठक, श्री विद्याविलास पाठक व सौ वीणाताई पाठक, श्री संजय पाठक व सौ सुखदा पाठक यांच्या हस्ते कुमारीका पुजन करण्यात आले.या कार्यक्रम प्रसंगी मा.श्री.विद्याविलासजी पाठक यांच्या कडून शाळेला 8 सिलींग फॅन भेट म्हणून मिळाले.

8) **कोजागिरी पौर्णिमा-** दि.26 ऑक्टोंबर 2015 रोजी संध्याकाळी आश्रमशाळेत कोजागिरी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा. श्री. आप्पासाहेब नवले, सचिव मा. श्री. ललीतदादा पाठक उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांनी रास गरबा नृत्य केले व नंतर सर्वांनी दुध घेतले.

9) **मार्गदर्शन वर्ग-** दि.1 नोव्हेंबर 2015 रोजी आश्रमशाळेत नंदुरबार येथिल इंग्रजी विषयाच्या अध्यापिका सौ शुभांगीताई दाउतखाने यांनी इंग्रजी विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच प्रा.श्री श्रीरामजी दाउतखाने सर यांनी जीवन कौशल्य विकास या विषयावर मार्गदर्शन केले.

10) **राष्ट्रीय युवक दिन-** दि.12 जानेवारी 2016 रोजी आश्रमशाळेत स्वामी विवेकानंद जयंती अर्थात राष्ट्रीय युवक दिन साजरा करण्यात आला.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांच्या कार्याची माहीती सांगितली.

11) **ग्रामस्वच्छता-** दि.18 जानेवारी 2016 रोजी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी जळखे गावातील गावदिवाळीच्या निमीत्ताने अस्वच्छ झालेला गावातील परीसर स्वच्छ केला. यावेळी संस्थेच्या सचिवांनी देखील सहभाग नोंदवीला.

12) **प्रजासत्ताक दिवस-** दि.26 जानेवारी 2016 रोजी आश्रमशाळेत भारतीय प्रजासत्ताक दिनानिमीत्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.सदर प्रसंगी नंदुरबार येथील प्रसिध्द डॉक्टर व संस्थेचे सभासद मा.डॉ.श्री भालचंद्रजी गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी मानवी मनो-यांचे रोमहषक प्रात्यक्षिके करून दाखविली.

13) **बाल साहित्य संमेलन भेट-** दि.27 जानेवारी 2016 रोजी आश्रमशाळेतील 45 विद्यार्थी व 4 विकास सहयोगी यांनी अमळनेर जि.जळगाव येथील बाल साहित्स संमेलनाला भेट दिली. विशेष उल्लेखनिय बाब म्हणजे शाळेतील इ.7 वी ची विद्यार्थीनी कु.अंजली शामू गावीत हीने एका परीसंवादात यशस्वी सहभाग नोंदवला.

14) **निरोप समारंभ-** दि.25 /02/2016 रोजी इ.10 वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ करण्यात आला यावेळी शाळेतील सर्व विकास सहयोगी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना शाळेच्या आठवणी सांगितल्या.

18) **विज्ञान दिन व मराठी दिन-** दि.29/02/2016 रोजी आश्रमशाळेत विज्ञान दिन व मराठी दिन साजरा करण्यात आला .श्री.प्रमोद सूर्यवंशी, दिपक महाजन व प्रशांत खाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## 3. जनजाती जीवन व शिक्षण संशोधन केंद्र

1) **जागतिक आदिवासी गौरव दिवस-** दि.9 ऑगस्ट 2015 रोजी आश्रमशाळेत विश्व आदिवासी गौरव दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.सदर कार्यक्रमास नंदुरबार लोकसभा मतदार संघाच्या खासदार मा.डॉ.हीनाताई गावीत ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या सोबत संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.कृष्णदासभाई पाटील, सचिव मा.श्री ललीतदादा पाठक, कोषाध्यक्ष मा. श्री. वासुदेवजी राव, ज्येष्ठ विश्वस्त मा.श्री.आप्पसाहेब नवले, विश्वस्त श्री. नानाभाऊ माळी, संस्थेचे सभासद, विकास सहयोगी, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रम प्रसंगी सत्कारार्थी

म्हणून विसरवाडीचे मा.श्री.के.टी.गावित, नंदुरबार चे मा.विरेंद्रजी वळवी, छायाचित्रकार मा.श्री नितीन पाटील शाळेची माजी विद्यार्थिनी राष्ट्रीय खेळाडू कु.ताई कोकणी हे उपस्थित होते.सदर कार्यक्रमाच्या निमीत्ताने भजन स्पर्ध्या आयोजित करण्यात आली होती.

2) **स्वातंत्र्य दिन-** दि.15 ऑगस्ट 2015 रोजी आश्रमशाळेत स्वांतंत्र्यदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिना निमित्त जळखे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी रांगोळीस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते तसेच आदिवासी सजाजातील वीर क्रांतीकारक आणि समाजसेवक यांच्या चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले.

## 4. कृषि विज्ञान केंद्र

कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार द्वारा शेती विषयक नवनवीन संशोधनाचे प्रात्यक्षिक, प्रशिक्षण केले जाते.

जिल्हयातील शेतकऱ्यांना उपयुक्त असे कृषि तंत्रज्ञान, विविध पिकांचे वाण, बियाणे निमिर्ती, बचत गटांना करता येण्यासारखे कृषिउद्योग यांची प्रत्यक्ष पाहणी केंद्राच्या प्रक्षेत्रावर तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर असते. कृषि विज्ञान केंद्रामध्ये माती परिक्षण, जैविक किड व रोग नियंत्रण पध्दती, प्रमुख अवजारे, जैविक खते यांच्या उत्पादनाच्या आणि प्रसाराच्या सुविधा उपलब्ध असतात तसेच मोबाईल वरुन कृषी विषयक एस.एम.एस. स्वयंचलित हवामान अंदाज देणारी यंत्रणा या सुविधा उपलब्ध असतात. दर दोन महिन्यांनी शेतकऱ्यांसाठी 'कृषक मंडळाचे' आयोजन केले जाते. त्यात शास्त्रज्ञ, प्रगतिशील शेतकरी यांचे चर्चासत्र घडवून आणले जाते.

दरवर्षी 'कृषि तंत्रज्ञान महोत्सवाचे' आयोजन केले जाते व त्यात बचत गटांच्या महिलांकरिता उद्योग परिषद, शेतकऱ्यांसाठी विविध विषयांवरील पिक परिसंवादाचे आयोजन करण्यात येते. विविध विषयातील शास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्थेचे कार्यकर्ते, कृषि अधिकारी, कृषि क्षेत्रातील विद्यार्थी, बचत गटातील महिला व पुरुष तसेच शेतकरी केंद्रास महोत्सवादरम्यान मोठया प्रमाणावर भेट देतात. या वर्षीचा 10 वा कृषि तंत्रज्ञान महोत्सव 05-10 ऑक्टोंबर 2015 दरम्यान मोठया उत्साहमध्ये साजरा झाला. त्यावेळी डॉ. हेडगेवार सेवा समिती संस्था पदाधिकारी, शास्त्रज्ञ, मोठया संख्येने शेतकरी, महिला कृषि विद्यालयातील विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था

आदींनी सहभाग नोंदविला. जिल्हयामध्ये कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून विविध प्रयोग सुरु आहेत.

<u>अहवाल वर्षातील कार्यक्रम -</u>

जिल्हयामध्ये कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून विविध प्रयोग सुरु आहेत.

**i) जलवायु समुत्थानशील कृषिपर राष्ट्रीय पहल (NICRA) :**

हवामान बदलांचा शेतीवर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने 'जलवायु समुत्थानशील कृषिपर राष्ट्रीय पहल (निक्रा)' हा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरु केला आहे. हवामान बदलाच्या दृष्टीने भारतातील 100 जिल्हयांमध्ये हा प्रकल्प राबविला जात आहे. त्यात महाराष्ट्रातील 4 जिल्हयात नंदुरबार तालुक्यात कृषि विज्ञान केंद्रातर्फे उमराणी ता. धडगाव येथे हा प्रकल्प सुरु आहे. हवामान बदलामुळेशेतीवर होणारा परिणामांची तीव्रता कमी करुन शाश्वत उत्पादन मिळविण्यासाठी तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिकेआयोजित केली जातात. या प्रात्यक्षिकांची चार घटकात विभागणी केलेली आहे. त्यात नैसगिर्क संसाधनांचे व्यवस्थापन, पीक उत्पादन, पशुसंवर्धन आणि संस्थात्मक उपाय समाविष्ट आहेत. या प्रत्येक घटकामध्ये विविध तंत्रज्ञानांची प्रात्यक्षिकेअसतात.

ICAR CRIDA Foundation Day निमित्ताने हैद्राबाद येथे राष्ट्रीयस्तरावरील कार्यशाळेत तानाजी फाडशा पावरा या शेतकऱ्याचा Farm Innovator म्हणून गौरव करण्यात आला.

| अ. क्र. | विवरण | संख्या |
|---|---|---|
| 1 | नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन | 77 |
| 2 | पीक पध्दती | 108 |
| 3 | पशुधन व्यवस्थापन | 246 |
| 4 | लोकसंचलित व्यवस्था | 227 |
| 5 | प्रशिक्षण | 480 |
| 6 | इतर विस्तार कार्यक्रम | 917 |

ii) **कृषि विज्ञान केंद्र-आत्मा कार्यक्रम:** कृषि विज्ञान केंद्र द्वारा आत्मा अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत दोन प्रात्यक्षिके घेण्यात आली असून त्या विषयाचे अध्ययन सुरु आहे. कृषि विज्ञान केंद्र आत्मा सहयोगाने खांडबारा परिसरातील 155 शेतकऱ्यांकडे कमी जागेवर व उपलब्ध पाण्यावर आधारीत शाश्वत उपजिवीका करिता भाजीपाला लागवड या तंत्रज्ञानाचे प्रयोग घेण्यात आले.

iii) **मुक्त कृषि शिक्षण केंद्र (YCMOU):** प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीद्वारे शाश्वत ग्राम विकासाचा प्रयत्न डॉ. हेडगेवार सेवा समिती द्वारे नंदुरबार जिल्हयात सुरु आहे. त्याचाच एक भाग म्हणुन कृषि विज्ञान केंद्रात य.च.महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक संलग्नित मुक्त कृषि शिक्षण केंद्र चालविले जाते. कृषि क्षेत्रात पदविका व पदवी पर्यंत शिक्षणाच्या संधी या अभ्यासक्रमाद्वारे उपलब्ध झाले आहे.

सन 2015-16 यावर्षी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी संख्या

| अ. क्र. | विषय | संख्या |
|---|---|---|
| 1 | कृषि अधिष्ठान | 60 |
| 2 | कृषि व्यवसाय व्यवस्थापन | 60 |
| 3 | कृषि पत्रकारीता | 55 |
| 4 | उद्यानविद्या पदवीका | 53 |
| 5 | कृषि पदवी | 02 |
| 6 | उद्यानविद्या पदवी | 05 |
| | एकुण संख्या : | 235 |

## 5. जनजाती विकास प्रकल्प (TDP)

खांडबारा समुहांतर्गत आठ गावांचा समावेश होतो यामध्ये बोरचक, करंजाळी, पालीपाडा, मौलीपाडा, निजामपुर, नगारे आणि निंबोणी या गावामध्ये जुलै 2007 पासुन राष्ट्रीय कृषि नवोन्मेषी प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पाची यशस्वीता पाहता वाडी प्रयोग इतर शेतकऱ्यांसाठी करावा उद्देशाने वाडी प्रकल्पाची संकल्पना पुढे आली.

हा प्रकल्प एकुण 7 वर्ष राबविला जाणार असुन या प्रकल्पाला 4 वर्ष पुर्ण होत आहेत.

अहवाल वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविले गेले.

1) **गॅप फिलींग -** TDP प्रकल्प अंतर्गत 500 वाडींचा सर्वे करण्यात आला त्यात काही वाडीतील 30 आंबा व 26 आवळा रोपांची संख्या कमी आढळुन आली म्हणुन वाडीधारकां कडुन आंबा व आवळा रोपे लोकसहभातुन लागवड करण्यात आली.

**2) जलस्त्रोत उपभोक्ता गट तयार करणे -**

i) विहीर खोलीकरण- विहीर खोलीकरण करणे करीता 50 कुटूंब मिळुन 10 गट तयार करण्यात आले आहे. TDP प्रकल्पांतर्गत ज्या वाडीधारकांच्या विहीरीला पाणी कमी आहे त्या वाडीधारकांना मिळुन एकुण 5 वाडीधारकांचा एक जलस्त्रोत उपभोक्ता गट तयार केला जातो. त्यासाठी 25000/- रु. प्रकल्प सहाय्य व वाडीधारकांच्या लोकसहभागातुन 10000/- रु. असे एकुण रु.35000/- मध्ये 7 फुट विहीर खोलीकरण करुन मिळते व त्यात उर्वरीत 4 वाडीधारकांच्या वाडीतील रोपांना पाणी उपलब्ध होते.

ii) इलेक्ट्रीक पंपसेट- इलेक्ट्रीक पंपसेट करीता 50 कुटूंब मिळुन 10 गट तयार करण्यात आले आहे. TDP प्रकल्पांतर्गत ज्या वाडीधारकांकडे पाण्याची सोय आहे. परंतु पाणी उचलण्याचे साधन नाही अशा वाडीधाकांना व इतर 4 वाडीधाकांचा एक गट तयार करुन त्या वाडीधारकांना एक इलेक्ट्रीक पंपसेट पुरवला जातो. त्यासाठी प्रकल्पसहाय्य रु.10000/- व वाडीभागधारक लोकसहभाग 10000/- रु. मिळुन एक इलेक्ट्रीक पंपसेट पुरवला जातो.

**3) सुधारित चुल (भाग्य लक्ष्मी चुल)-** TDP प्रकल्पांतर्गत 500 वाडीधारक कुटूंब व 50 भुमिहीन भागधारक कुटूंब मिळून एकुण 550 सुधारित चुल पुरवण्यात आल्या.

**4) वाडीधारक अभ्यास** पाणी पेराल तर पाणी उगवेल ांडबारा समुहातील 100 वाडीधारकांना प्रशिक्षण त राज्यातील नवसारी जिल्हयातील वासदा येथे नेण्यात आली त्याठीकाणी स्व. डॉ. मनिभाई देसाई स्मृती उद्यान ध्रुव बायफ, वृंदावन कॅम्पस लालकडी येथे वाडीधारकांना अभ्यास सहल नेण्यात आली.

तसेच वाडीतुकडी गट प्रमुखांना मोलगी येथे अभ्यास सहल नेण्यात आली. त्या ठिकाणी कच्च्या कैरीपासुन आमसुल कसे बनवितात हे पाहिले व आमसुल विक्री बाजारपेठ ला भेट दिली.

**5) शिबीर-** TDP प्रकल्पांतर्गत खांडबारा समुहातील 8 गावांमध्ये शिबीर आयोजित करण्यात आले. त्यात नेत्र तपासणी शिबीर, महिला आरोग्य तपासणी शिबीर आणि रक्तगट तपासणी शिबीर हे तिन्ही शिबीर आयोजित करण्यात आले.

अ) नेत्र तपासणी शिबीर- खांडबारा समुहातील 8 गावांमध्य एकुण 521 रुग्णांची तपासणी करण्यात आली, त्यातुन 98 रुग्ण मोतीबिंदु शस्त्रक्रीया करणारे आढळुन आले.

ब) महिला आरोग्य तपासणी शिबीर- खांडबारा समुहातील 8 गावांमध्य एकुण 336 रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातुन DM चे 24 व HTN चे 30 रुग्ण आढळुन आले.

क) रक्तगट तपासणी शिबीर- खांडबारा समुहातील 4 गावांमध्य् एकुण 366 लोकांचे रक्तगट तपासणी करण्यात आली.

**6) प्रशिक्षण-** TDP प्रकल्पांतर्गत खांडबारा समुहातील 500 वाडीभागधारक व 50 भुमिहीन भागधारक यांना प्रकल्पांतर्गत खालील प्रमाणे विविध प्रशिक्षण देण्यात आले.

| | प्रशिक्षणाचे नाव | | संख्या |
|---|---|---|---|
| 1. | वाडी तुकडी गट | - | 4 |
| 2. | वाडीधारक प्रशिक्षण | - | 8 |
| 3. | प्रक्रीया उद्योग प्रशिक्षण | - | 3 |
| 4. | श्रम कमी करणारे अवजारे | - | 4 |
| 5. | भुमिहीन भागधारक | - | 1 |
| 6. | कर्मचारी प्रशिक्षण | - | 1 |

**7) वाडी तुकडी गट-** आदिवासी विकास कार्यक्रम अंतर्गत वाडी तुकडी गट स्थापन केले. त्यामध्ये प्रत्येक 8 गावातील वाडीधारकांमध्ये 10 वाडयांमधुन 1 वाडीतुकडी प्रमुखाची निवड करणे त्या गटप्रमुखाचे काम म्हणजे त्याला नेमलेल्या 10 वाडीधारकांकडे प्रत्यक्ष वाडीला भेट देऊन वाडीला सगळया गोष्टींकडे लक्ष देणे, रोप तपासणी करणे, आळे करवुन घेणे, आधार करणे, मलचिंग करुन घेणे, साहीत्या बाबत माहिती देणे.

वाडी तुकडी बैठकीत झालेल्या विषयांवर 10 वाडी धारकांना घेऊन माहिती देऊन चर्चा करणे रोग-किड, आंतरपिक, पाणी व्यवस्थापन, सावली करणे याबद्दल माहिती देणे व प्रत्यक्ष वाडीत जाऊन काम करवून घेणे.

अशा प्रकारे 500 वाडीभागधारकामागे 50 वाडी गट प्रमुख तयार करुन महिन्यातुन 1 वेळा बैठक घेणे हे वाडी तुकडी गटाचे वैशिष्टये आहेत.

**8) गाव विकास समिती-** आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत खांडबारा समुहातील वाडीधारकांच्या गावातील प्रत्येक 8 गावातील 2 प्रमुखांची नेमणूक करणे व ते 2 वाडीधाकरकांची निवड करणे व CLC च्या मासिक बैठकीला उपस्थित राहणे. CLC बैठकीत झालेले विषय वाडीधारकांसोबत बैठक घेऊन त्यांना सांगणे तसेच या बैठकीत असलेले विषय, अडचणी CLC बैठकीत मांडणे.

**9) भुमिहीन भागधारक कुटूंब-** TDP प्रकल्पांतर्गत खांडबारा समुहातील 8 गावात 50 भुमिहीन कुटूंबांना निवडयात आले होते. त्यापैकी एकुण 42 कुटूंबांना प्रत्येकी 5 उस्मानाबादी शेळया व 20 गिरीराज जातीचे कोंबडीचे एक महिन्याचे पिल्लु पुरविण्यात आले होते.

तसेच 8 भुमिहीन कुटूबांना प्रत्येकी 2 उस्मानाबादी बोकड व 20 कोंबडीचे पिल्लु देण्यात आले.

या प्रयोगामुळे भुमिहीन कुटूंबाला रोजगार मिळावा म्हणुन प्रत्येक कुटूंबाला मोगी कोळपे, हॅन्ड रिझर, शेंगा तोडणी यंत्र हे भाडे तत्वावर द्यावे व त्यापासुन रोजगार कमवावा अशी व्यवस्था कुटूंबाकडे तयार केली.

पहिल्या वर्षी वाटप करण्यात आलेल्या शेळयांचे एकुण 39 पिल्लु परत घेऊन ते पिल्लु नविन 21 कुटूंबांची निवड करुन वाटप करण्यात आले.

## 6.शिक्षण संसाधन केंद्र (ERC)

डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार संचलित 'एज्युकेशन रिसोर्स सेंटर' हे शिक्षण क्षेत्रात 2008 सालापासून कार्यरत आहे. शिक्षणात गुणवत्तेसाठी प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणात आवड निर्माण व्हावी, तसेच शिक्षणाबरोबरच विविध कलागुणांना वाव मिळावा. सेंटर म्हणजेच ERC विविध उपक्रम राबवित असते.

निबंधस्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, विद्याथ्र्यांचा व शिक्षकांचा गुणगौरव, चित्रकला स्पर्धा, रंगभरण स्पर्धा, विविध 'दिन' साजरा करणे, गणित यात्रा, गणित आनंद यात्रा, अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी व शिक्षकांपर्यंत ERC पोहचवण्याचा

प्रयत्न करीत असते. ERC तर्फे शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये काही उपक्रम राबविले गेले त्यांची माहिती पुढीलप्रमाणे-

**1) गणित आनंद यात्रा-** डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार संचलित शिक्षण संसाधन केंद्राच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या लिलावती गणित अभ्यासकेंद्रा तर्फे दिनांक 21 ते 23 डिसेंबर 2015 दरम्यान गणित आनंद यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

गेल्या वर्षापासुन या गणित आनंदयात्रेचे आयोजन केले जाते हे या गणित आनंद यात्रेचे दुसरे वर्ष होते. दिनांक 21 ते 23 डिसेंबर या तीन दिवस यात्रेचे आयोजन केले होते. ही यात्रा एकुण 9 शाळांमधुन 4516 विद्यार्थ्यांपर्यंत नंदुरबार, जळखे, सुंदरर्दे, पातोंडा या गावांमधुन गणित आनंद निर्माण करीत पोहचली. या गणित यात्रेचे उद्घाटन एम. एल. पटेल इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये शिक्षणाधिकारी डॉ. राहूल चौधरी यांचे हस्ते करण्यात आले या वेळी या संस्थेचे डॉ. वसंतभाई पटेल व ऍ़ड. चौधरी हे मान्यवर संचालक देखील उपस्थित होते.

या गणित यात्रेत गणित गाणी, गणित गोष्टी, गणित शास्त्रज्ञांच्या जीवन चरितात्राची मांडणी, वैदीक गणित, गणित कोडी, गणित प्रदर्शनी अशा विविध माध्यमांमधून गणिता बद्दलची भिती कमी करणे, गणिताबद्दल आस्था, प्रेम निर्माण करणे हा हेतू डोळ्यासमोर ठेवून या गणित आनंद यात्रेचे आयोजन करण्यात आले होते गणिताचे पाढे आरतीच्या चालीवर म्हणणे, पाढे उलटे म्हणणे अशा मनोंरजनात्मक प्रकारे विद्यार्थ्यांसमोर पाढे गायले गेले.

या यात्रेत पुण्याहुन आलेले प्राचार्य आण्णासाहेब नानकर, धुळयाहुन आलेले प्रा. विश्वासराव नकाणेकर, नंदुरबारचे प्रा. आर. एस. माळी, प्रा. शशीकुमार अर्थेकर, ललीत पाठक, नानाभाऊ माळी, गिरीश बडगुजर, दिलीप जोशी, गोपाळकृष्ण पंचभाई, श्याम जगदाणे, योगेश सोनवणे, सतीश पाटील, बागुल सर यांनी सहभाग नोंदविला

**2) हस्ताक्षर स्पर्धा-** डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार संचलित एज्युकेशन रिसोर्स सेंटर, नंदुरबार तर्फे दरवर्षी कै.नानालाभे यांच्या स्मृती प्रित्यर्थ "कै. नानालाभे हस्ताक्षर स्पर्धा" ही स्पर्धा राबविण्यात येते. या वर्षी त्यांच्या तृतीय स्मृती प्रित्यर्थ राबविण्यात आली. त्यात दर वर्षाप्रमाणे या वर्षी गणित विचार व भारतीय गणिततज्ञांची माहिती विद्यार्थ्यांकडून त्यांच्या हस्ताक्षरात लिहून घेण्यात यावी व

त्याचे संकलन पुस्तीका प्रकाशीत करावी अशी मनात आशा धरुन ही स्पर्धा राबविली गेली.

नंदुरबार शहरातील एकुण 8 शाळा व तालुक्यातील एकुण 6 शाळा त्यात सहभागी झाल्या. या मागचा हेतु हाच की ग्रामीण भागातील विद्यार्थी सुध्दा मागे न राहता शहरातील विद्यार्थ्यांशी बरोबरी करता येईल. इयत्ता 3 री ते इयत्ता 7 चे असे एकुण 5 गट तयार आणि प्रत्येक गटात 10 विद्यार्थ्यी असे स्पर्धेचे स्वरुप होते. प्रत्येक शाळेतुन सुंदर हस्ताक्षर असणारे एका वर्गाचे 10 विद्यार्थी घेऊन ही स्पर्धा राबविण्यात आली. त्यात सर्व शाळांमधुन उर्त्फुत प्रतिसाद देवून एकुण 14 शाळांमधुन 486 विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले. याच वेळी "गणित विचार" हया 14 हस्तलिखीताचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

प्रत्येक गटातील एका विद्यार्थ्याला प्रमाण पत्र देवुन गौरविण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांमधुन एकुण पहिल्या पाच विद्यार्थ्यांना रोख स्वरुपात बक्षीसे वाटप करण्यात आली. त्या सर्व बक्षीसाची रोख रक्कम श्री.नरेश शहा यांच्या तर्फे दिली जातात.

या स्पर्धेचे उद्धाटन निवृत्त मुख्याध्यापक श्री. विष्णू रामचंद्र जोशी यांचे हस्ते करण्यात आले यावेळी श्री. जोशी सरांनी संस्थेस रुपये 5000/- ची देणगी दिली.

स्पर्धेचे आयोजनात श्री. ललीत पाठक, गिरीश बडगुजर, दिलीप जोशी, गोपाळकृष्ण पंचभाई, सरदार पावरा, नरेंद्र मराठे, शाम जगदाणे, योगेश सोनवणे सहभाग घेतला.

## 7. लिलावती गणित अभ्यास केंद्र

**कै. वसंतराव चंद्रात्रे गणित पुरस्कार -**या यात्रेतच संस्थेतर्फे कै.वसंतराव चंद्रात्रे गणित पुरस्कार दिला जातो. या वर्षी हा पुरस्कार प्रा. एम. एल. नानाकर यांच्या हस्ते व मा. आप्पासो. नवले यांच्या अध्यक्षते खाली श्रॉफ हायस्कुल चे विद्यार्थीप्रिय गणित शिक्षक व उपमुख्याध्यापक श्री. एकनाथ मराठे यांना देण्यात आला. पुरस्काराचे स्वरुप रोख रु. 501, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र असे असून हा कै. वसंतराव चंद्रात्रे यांच्या कन्या श्रीमती शुभांगी देशपांडे, अमरावती यांनी दिलेल्या निधीतुन दिला जातो. हे हया पुरस्कारचे दुसरे वर्ष आहे.

# 8. श्री गुरुजी वाचनालय

**वाचन प्रेरणा दिवस-** दि.15 ऑक्टोंबर 2015 रोजी आश्रमशाळेत वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून दिले तसेच विद्यार्थ्यांनी एक हजार पुस्तके वाचन करण्याचा संकल्प एका आठवड्यात पुर्ण केला. या कार्यक्रमात नंदुरबार येथील मान्यवर मा.प्रा.श्रीराम दाउतखाने, जेष्ठपत्राकार मा.श्री.विद्याविलास पाठक, संस्था सचिव मा.श्री.ललीतदादा पाठक उपस्थित होते.

**डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार विकास सहयोगी (कर्मचारी वृंद)**

| क्र. | विकास सहयोगी | पद |
|---|---|---|
| डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार | | |
| 1 | श्री.गिरीश बडगुजर | प्रशासकीय अधिकारी |
| 2 | श्री. विकास गोडसे | विकास अधिकारी |
| 3 | श्री. दिलीप जोशी | कार्यालय अधिक्षक |
| 4 | श्री. योगेश सोनवणे | वाहन चालक |
| कृषि विज्ञान केंद्र, कोळदा | | |
| 5 | श्री. राजेंद्र दहातोंडे | कार्यक्रम समन्वयक (प्र) |
| 6 | श्री. रविंद्र पाटील | विषय विशेषज्ञ |
| 7 | श्री. जयंत उत्तरवार | विषय विशेषज्ञ |
| 8 | श्री. पद्माकर कुंदे | विषय विशेषज्ञ |
| 9 | श्री. उमेश पाटील | विषय विशेषज्ञ |
| 10 | सौ. रेखा कारभारी | विषय विशेषज्ञ |
| 11 | श्री. राजेश भावसार | कार्यक्रम सहाय्यक |
| 12 | श्री. विजय बागल | कार्यक्रम सहाय्यक |
| 13 | डॉ. महेश गणापुरे | कार्यक्रम सहाय्यक |
| 14 | कु. गिता कदम | सहाय्यक |
| 15 | श्री. राहुल नवले | संगणक परिचालक |
| 16 | श्री. कल्याण पाटील | वाहन चालक |
| 17 | श्री. रजेसिंग राजपूत | वाहन चालक |
| 18 | श्री. किरण मराठे | मदतनिस |
| 19 | श्री. कैलास सोनवणे | मदतनिस |

| | | |
|---|---|---|
| प्राथमिक आश्रमशाळा, जळखे | | |
| 20 | श्री. रमेश शिंदे | मुख्याध्यापक |
| 21 | श्री. प्रमोद सुर्यवंशी | शिक्षक |
| 22 | श्री. अनिल रौंदळ | शिक्षक |
| 23 | श्रीमती. ज्योती वळवी | शिक्षिका |
| 24 | श्री. नरेंद्र मराठे | शिक्षक |
| 25 | श्री. महेंद्र निकवाडे | शिक्षक |
| 26 | श्री. अशोक पाटील | शिक्षक |
| 27 | कु. हर्षदा वाघ | शिक्षिका |
| 28 | श्री. भरत जाधव | अधिक्षक |
| 29 | कु. दिपाली गर्गे | अधिक्षिका |
| 30 | श्री. भिमसिंग चौधरी | कामाठी |
| 31 | श्री. किरण जांभळे | मदतनिस |
| 32 | सौ. गोकुळा पाडवी | अन्नपुर्णा |
| 33 | सौ. सुखदा पाठक | अन्नपुर्णा |
| 34 | श्रीमती. कमलाबाई वळवी | अन्नपुर्णा |
| 35 | श्रीमती. लिलाबाई लांडगे | अन्नपुर्णा |
| 36 | श्री. रोहीदास वसावे | पहारेकरी |
| माध्यमिक आश्रमशाळा, जळखे | | |
| 37 | श्री. रणवीरसिंह पाडवी | मुख्याध्यापक |
| 38 | श्री. योगेश निकुंभ | शिक्षक |
| 39 | श्री. प्रविण सोनवणे | शिक्षक |
| 40 | श्री. प्रशांत खाडे | शिक्षक |
| 41 | श्री. दिपक महाजन | शिक्षक |
| 42 | श्री. राजाराम यार्दी | लिपीक |
| 43 | श्री. भरत माळी | प्रयोगशाळा परिचर |
| 44 | श्री. दिनेश गवळी | शिपाई |
| 45 | श्री. सुरेश बेडसे | कामाठी |
| 46 | सौ. सलमा पाडवी | स्वयंपाकी |
| 47 | श्रीमती. संगिता अहिरे | स्वयंपाकी |
| जनजाती विकास प्रकल्प (प्रकल्प कालावधी पुरते) | | |

| | | |
|---|---|---|
| 48 | श्री. राकेश खलाणे | प्रोजेक्ट मॅनेजर |
| 49 | श्री. नितीन वळवी | प्रोजेक्ट असिस्टंट |
| 50 | श्री.गोपाळकृष्ण पंचभाई | लेखापाल |
| एन. आय. सी. आर. ए. (प्रकल्प कालावधी पुरते) | | |
| 51 | श्री. अरुण कदम | सिनीयर रिसर्च फेलो |
| 52 | श्री. कमलकिशोर देशमुख | सिनीयर रिसर्च फेलो |

## संस्थेस भेट देणारे मान्यवर

1) मा. डॉ. अलका मांडके, अध्यक्षा, केशव सृष्टी, मुंबई
2) मा. डॉ. ए. आर. रेड्डी, प्रिन्सीपल सायन्टीस्ट, हैद्राबाद
3) मा. गिरीषजी महाजन, जलमंत्री, महाराष्ट्र राज्य
4) मा. डॉ. हिनाताई गावीत, खासदार, नंदुरबार
5) मा. उदयसिंगजी पाडवी, आमदार, शहादा
6) मा. किरण कोकाटे, म.फु.कृ.विद्यापीठ, राहुरी
7) मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार
8) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., नंदुरबार
9) मा. उपकुलसचिव, म.फु.कृ.विद्यापीठ, राहुर
10) मा. जिल्हा पुरवठा अधिकारी, नंदुरबार
11) मा. रविंद्रजी गाडे, प्रान्त सो.
12) मा. शास्त्रज्ञ विभागीय विस्तार केंद्र, म.फु.कृ.वि., राहुरी
13) मा. जिल्हाअधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विभाग, नंदुरबार
14) मा. संचालक व उपसंचालक आत्मा, नंदुरबार
15) मा. जिल्हा मासिक चर्चासत्र अधिकारी गण
16) मा. डॉ. तुरबटमत म.फु.कृ.वि., राहुरी
17) मा. डॉ. देशमूख म.फु.कृ.विद्यापीठ, राहुरी
18) मा. कानडे, प्रमूख, कृषि प्रक्रिया, म.फु.कृ.वि., राहुरी
19) मा. डॉ. मधुकर बेडीस व शास्त्रज्ञ, औषधी वनस्पती विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी
20) मा. प्रमूख व शास्त्रज्ञ गण कृषि अभियांत्रिकी, म.फु.कृ.वि., राहुरी
21) मा.शिवकूमार व शास्त्रज्ञ गण, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ग्रासलॅन्ड, धारवाड
22) श्री. एन. बी. साबळे, सहा. प्रकल्प अधिकारी

23) डॉ. छाया शिसोदे, डॉक्टर
24) श्री. आर. एस. निकम, शिक्षण विस्तार अधिकारी
25) श्री. सी. के. पाटील, गटशिक्षण अधिकारी
26) श्री. आर. एस. पवार, उपलेखापाल
27) श्री. ए.डी. तावडे, शिक्षण विस्तार अधिकारी
28) मा. राजजी चौधरी, अ.भा. महामंत्री, क्रीडा भारती
29) मा. केशवराव नांदेडकर, अ.भा. कोषाध्यक्ष, क्रीडा भारती
30) प्रा. अमेय जाधव,, मुंबई
31) मा. गिरीषजी कुबेर
32) जलतज्ञ कै. मुकूंद धाराशिवकर
33) मा. कैलाजजी जैन, चेअरमन, हस्त्री बँक
34) प्राचार्य एस. एम. नानकर
35) मा. आमदार डॉ. विजयकुमार गावित
36) मा. घनश्यामजी राठोड, क्रीडा अधिकारी

## Publications - KVK, Nandurbar

1) ज्वारी पिकांतील जैवविविधता
2) Role of Tribal women in Agriculture operations in Nandurbar District of Maharashtra.
3) Poshan Vatika – An alternate Livelihood option for Tribal Families.
4) Celebration of Farm mechanization day.
5) शेतकरी पीक ओ वाण संरक्षण हक्क कायदा
6) Mogi – Improved Wheel Heo- An efficient implement for weeding & intercultural operation.
7) सोयाबीन विविध खाद्य पदार्थ उत्पादनातून उद्योग निर्मिती.
8) कोनोविडर करेल भातातील तणनियंत्रण
(9) गाजरे गवत : एक घातक तण
10) हरभर्याचे सुधारित लागवड तंत्रज्ञान
(11) सोयाबीन लागवड तंत्रज्ञान
12) ठिबक सिंचन संच- बसवितांना...बसविल्यानंतर...
(13) गहू लागवड तंत्रज्ञान
(14) आंबा उत्पादन तंत्रज्ञान




जागतीक रक्तदाता दिना निमित्ताने ब्लडबँकेत जाऊन रक्तदान करतांना




कै. नाना लाभे यांच्या स्मृती प्रितर्थ हस्ताक्षर स्पर्धा



विद्यार्थ्यांची गणितातील भिती दुर व्हावी म्हणुन गणित आनंद यार्त्रेचे आयोजन


शेतकऱ्यांना शैक्षणीक सहली अंतर्गत विविध युनिटची माहिती देतांना




जमीन आरोग्य पत्रिका कार्यक्रमास मार्गदर्शन करतांना मा. डॉ. हिनाताई गावित,खासदार नंदुरबार




मुक्त कृषी शिक्षण केंद्र समारोप सोहळा- मा. किशोर चौधरी, श्रीमती. शितल चौधरी, मा. मंदार मुंडले, उपसंपादक अग्रोवन



बाल साहित्य संमेलनाच्या एका परिसंवादात इ. 7वी च्या विद्यार्थीनीने घेतलेला सहभाग




वाचन प्रेरणा दिवसानिमित्ताने पुस्तक प्रदर्शन




कै. वसंतराव चंद्रात्रे गणित पुरस्कार प्रदान करतांना




संस्थेच्या मृदगंध कार्यक्रमात बोलतांना मा.डॉ. अलकाताई मांडके